**आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूर**

पत्ता- आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, नागाळा पार्क कोल्हापूर
फोन नं. :- ०२३१ - २६६१६४०, २६५२३२७
फॅक्स नं.:- ०२३१ - २६८०३१२
ई मेल. dhokop2@gmail.com, dhokolhapur@rediffmail.com

आरोग्य सेवा

Be Wise! Get your child fully immunized

जाक्र/जिप/आरोग्य/बालमृत्यु अन्वेषण/1546/१८
आरोग्य विभाग,जिल्हा परिषद कोल्हापूर
दि.05/०४/२०१८

प्रति,

१)तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती ..........(सर्व)

२)वैद्यकीय अधिकारी, प्रा.आ.केंद्र ....................(सर्व)

**विषय – सन २०१७-१८ मधील सर्व बालमृत्यु अन्वेषण सभेमध्ये मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिलेल्या सुचना नुसार कार्यवाही बाबत...**

**संदर्भ - बालमृत्यु अन्वेषण जिल्हास्तरीय सभा दि.२०/०४/२०१८ मधील मुख्य.कार्यकारी अधिकारी यांची सुचना**

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन सन २०१७-१८ मध्ये वर्षभरात झालेल्या बालमृत्यु अन्वेषण जिल्हास्तरीय सभेमध्ये मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खालील प्रमाणे सुचना दिल्या आहेत.त्याचे काटेकोरपणे पालन करुन चालुवर्षी अर्भकमृत्यु व बालमृत्यु दर कमी करणेसाठी सर्वांनी प्रयत्न करणे अपेक्षित आहे.

- सर्व बालमृत्युच्या केसेसचे अन्वेषन प्रथम प्रा.आ.केंद्र व त्यानंतर तालुकास्तरावर होवून परिपुर्ण अहवाल जिल्हास्तरावर सादर करणेत यावे. सदर सुचनांची अंमलबजावणी न झाल्यास संबंधीतावर जबाबदारी निश्चीत करणेत येईल याची नोंद घ्यावी.
- जिल्हास्तरावरील बालमृत्यु अन्वेषन समिती समोर केसेस सादर करणेपुर्वी जिल्हा आर.सी.एच. अधिकारी यांच्याकडे निवडलेल्या सर्व केसेसचे प्रथम discussion करणेत यावे.
- बालमृत्युच्या अन्वेषन करीता सुरवातीपासुन कुणी काय करायचे त्याचा Flow Chart सादर करणेत आला आहे त्यानुसार कार्यवाही करुन परिपुर्ण अहवाल जिल्हास्तरावर सादर करणे.

- ➢ जे.एस.एस.के. मार्फत Drop Back ची सेवा देऊन संबधीत वैद्यकिय अधिकाऱ्यांच्या सल्याने सी.पी.आर.रुग्णालय येथुन घरी डिसचार्ज देणेत आलेल्या बालकांना गरजेनुसार प्रा.आ.केंद्र किंवा ग्रामीण रुग्णालयात ठेवणेची सोय करणेत यावी.
- ➢ उपकेंद्र, प्रा.आ.केंद्र व ग्रा.रु. स्तरावरुन अनावश्यक पेशंटला संदर्भित करणेत येऊ नये व पेशंटला संदर्भ सेवा देणे आवश्यक असल्यास सदर पेशंटचा दैनंदिन पाठपुरावा करणेत यावा. शासकीय संस्थेमध्ये व शासकीय योजनांचा जास्तीत जास्त लाभ देणेत यावा.
- ➢ मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सीपीआर हॉस्पिटल मार्फत ग्रामीण भागातील या प्रकारच्या घटनांकरीता रेकॉर्ड उपलब्ध करुन देणेकरीता महिन्यातुन १ दिवस निश्चित करावा अशा सुचना दिल्या आहेत
  - त्यानुसार महिन्याचा दुसरा सोमवार निश्चीत करणेत आला आहे. सोमवारी शासकीय सुट्टी असल्यास दुसरा मंगळवार निश्चीत करणेत आला आहे.
- ➢ प्रा.आ.केंद्रामध्ये रुग्णाबाबतच्या सर्व योग्य व अद्ययावत नोंदी ठेवणेबाबत कार्यवाही करणेच्या सुचना दिल्या. बालमृत्यु अन्वेषन साठी गरोदरपणापासुन बालमृत्युपर्यंतची सर्व कागदपत्रे उपलबध करुन प्रा.आ.केंद्रस्तरावर अन्वेषन करणेत यावे.
- ➢ ए.एन.सी. क्लिनीक किंवा प्रधानमंत्री सुरक्षीत मातृत्व अभियान अतंर्गत आढळलेल्या जोखमीच्या मातांना ज्यांचे anomalies scan करणे आवश्यक आहे. अशा मातांसाठी 4D scan शासन स्तरावरुन सोय करणेत यावी.
  - Family Indemnity Budget मधुन ट्रेनींग,वर्कशॉप लावणे
  - CPR Hospital मध्ये 4D scan सुविधा होणेकरीता प्रयत्न करणे.
  - प्रधानमंत्री सुरक्षीत मातृत्व अभियान अतंर्गत ज्याप्रमाणे खाजगी Gynecologist सहभाग घेतला जातो. त्याप्रमाणे Radiologist चा सहभाग करणेत यावा.
- ➢ दुसऱ्या बाळामध्ये जन्मजात वैगुण्य येवु नये म्हणुन पुढील गरोदरपणात काळजी घेणे. समुपदेशन करणे.
- ➢ आशा स्वयंसेविका व आरोग्य सेविकांनी प्रत्येक आजारी बालकासाठी जास्तीत जास्त १०८ च्या गाडीचा वापर करण्याचा सल्ला दिला. १०८ योजनेसंबधी नातेवाईकांना अवगत करणेसंबधी सुचना देण्यात आल्या.
- ➢ शिरोळ तालुक्यात चालु असलेली कोपरा सभेची संकल्पना जिल्हयातील प्रत्येक तालुक्यात राबविण्यात यावी.जेणेकरुन आरोग्याच्या सर्व सुविधा लोकांपर्यंत पोचविण्यास मदत होईल.
- ➢ त्याचप्रमाणे प्रत्येक गावात आरोग्य संरक्षक भिंतींचा व संस्कारवाहिनींचा वापर करुन आरोग्याच्या सर्व सुविधा आरोग्यविषयक संदेश ई.चा प्रसार लोकांपर्यंत करणेत यावा.
- ➢ अपुऱ्या दिवसाच्या प्रसुतीमध्ये आरोग्य सेविकांनी Inj Dexamethasone वापर करावा
- ➢ आरोग्य सेविकांनी वेळापत्रकानुसार तसेच आवश्यकतेनुसार जादाच्या **New Born Visit** नियीमत दिल्या पाहिजेत.
- ➢ आरोग्य सेविकांनी **New Born Visit** मध्ये **FIMNCI** प्रशिक्षणानुसार **Respiration rate** (श्वसनाचा दर) **Fedding difficulty** (स्तनपानातील अडचणी) याची तपासणी केली पाहिजे त्यानुसार पालकांना मार्गदर्शन केले पाहिजे.
- ➢ वैद्यकिय अधिकाऱ्यांनी मासीक सभेमध्ये आपल्या सर्व स्टाफचे माता व बाल आरोग्य विषयी **Sensitization** करावे.

- प्रा.आ.केंद्राच्या ठिकाणी प्रसुती वैद्यकिय अधिकाऱ्यांनी करावी अशा सुचना दिल्या.
- MOU करुन प्रत्येक तालुक्यातील रेडिओलॉजीस्टशी करार केला आहे त्याचा जास्तीत जास्त लाभार्थ्यांसाठी उपयोग करुन anomalies scan करुन घ्यावे
- Bad Obs History असणाऱ्या लाभार्थ्यांची दुसऱ्या गरोदरपणात विशेष काळजी घ्यावी.
- आरोग्य सेविका व आशा यांच्या मासिक सभेमध्ये सीपीआर हॉस्पिटल मधील उपलब्ध सुविधांबाबत सविस्तर माहिती देवून त्यांच्या मार्फत सीपीआर हॉस्पिटल मधील उपलब्ध सुविधांची माहिती लाभार्थीपर्यंत पोहोचविणे बाबत आपल्या स्तरावरुन सुचना देणेत याव्यात.
- वर्षभरातील सर्व बालमृत्युच्या केसेसची यादी सादर करणे.
- सी.पी.आर.रुग्णालयातुन डिसचार्ज देताना ज्या बालकांना निरीक्षणाची आवश्यकता आहे अशा बालकांना घरी डिसचार्ज देणेपेक्षा उपजिल्हा/ग्रा.रुग्णालय किंवा प्रा.आ.केंद येथे संदर्भित करणेत यावे.
- आवश्यक केसमध्ये निदान निश्चितीसाठी संबधित बालमृत्युचे शवविच्छेदन होणेकरीता त्यांचे पालकांचे समुपदेशन करणेत यावे. लेखी सल्ला दिला पाहिजे. पालकांनी नकार दिल्यास आवश्यकतेनुसार एमएलसी करणेत यावी.
- भौगोलीक कारणांमुळे जोखमीच्या ठरणाऱ्या मातोना forcefully सुरक्षीत ठिकाणी shift करावे तशी लिखीत नोंद ठेवावी असे सुचवले.
- संस्थात्मक प्रसुती वाढवाव्यात.
- बाळ जन्मल्यानंतर काळजी घेणेसाठी ज्या चुकीच्या पारंपारीक अवैद्यकिय पध्दतीचा अवलंब केला जातो त्या कमी करणेसाठी सदर समुदायाचे समुपदेशन करणेत यावे.
- वरीलप्रमाणे आजपर्यंतच्या बालमृत्यु अन्वेषण समिती सभेच्या सर्व सुचना पुन्हा एकदा सर्व कर्मचारी, वैद्यकिय अधिकारी,तालुका आरोग्य अधिकारी यांच्यापर्यंत मेल व्दारे,मिटींगच्या माध्यमातुन पोहचवाव्यात.

तरी वरीलप्रमाणे कार्यवाही करुन बालमृत्यु कमी होणेसाठी प्रयत्न करणेत यावेत व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बाल मृत्यु मिटींगमध्ये लेखी स्वरुपात सादर करावा.

जिल्हाआरोग्य अधिकारी
जिल्हापरिषद, कोल्हापूर

प्रत माहितीसाठी सविनय सादर

७) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.कोल्हापूर

८) मा.उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर